## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

### सेतू-अभ्यास पूर्व चाचणी

### विषय – मराठी

इयत्ता : दुसरी गुण १५

विद्यार्थ्याचे नाव :

शाळेचे नाव-

प्रश्न १) विद्यार्थ्याला आवडणारे बडबडगीत म्हणावयास सांगणे . गुण १

प्रश्न २) शिक्षकांनी चार चार शब्दांचे गट करावेत. त्यापैकी तीन शब्द एक प्रकारचे व एक शब्द गटात न बसणारा असावा . विद्यार्थ्याने लक्षपूर्वक ऐकून गटात न बसणारा शब्द ओळखावा . गुण १

उदा. गुलाब, सिंह, चमेली,मोगरा

प्रश्न ३) सांगितलेल्या सुचनांप्रमाणे विद्यार्थ्यांना कृती करण्यास सांगावे. हा खेळ गटागटाने घ्यावा, त्यावेळी गटातील विद्यार्थ्यांचे नाव घेऊन तोंडी आज्ञा द्याव्यात दोन सूचना व दोन नकला करावयास सांगणे.

गुण १

उदाहरणार्थ - उठा, पळा, नागमोडी चला, स्कूटर सुरू करा, काठी टेकवत चला या प्रमाणे विविध नकला करून घेणे.

प्रश्न ४) विद्यार्थ्याला स्वतः संबंधी बोलण्यास सांगणे. गुण १

प्रश्न ५) दोन चित्रांची व शब्दपट्ट्यांची जोडी कृतीने जुळवून घेणे. गुण १

प्रश्न ६) विद्यार्थ्यांना पहिले अक्षर समान असणारे तीन परिचित शब्द ऐकवावेत. त्यातील समान ध्वनी कोणता ते विचारा. गुण १

उदाहरणार्थ- १) कप, कमळ, करडई

२) आई, आज, आपण

प्रश्न ७) शब्दात जेवढी अक्षरे तेवढ्या टाळ्या वाजव. गुण १

उदा. स-दा-फु-ली --- ४ टाळ्या (या सारखे आणखी वेगळे मुलांच्या अनुभवातील शब्द सांगावेत)

प्रश्न ८) वर्गातील साहित्याच्या, वस्तूच्या नामपट्ट्या योग्य ठिकाणी ठेवणे. गुण १

फळा, टेबल, दरवाजा, पेटी, कपाट........

प्रश्न क्र. ९) शिक्षकांनी काही दोन वाक्य असलेले शब्दडोंगर कार्ड तयार करावेत व तिसरे वाक्य विचारावे. गुण १

जसे- घर

माझे घर

----------------

प्रश्न क्र. १०) पाच फळांची चित्र व त्यांच्या नामपट्ट्या यांच्या जोड्या लावण्यास द्या. गुण १

प्रश्न क्र.११) तुझी स्वतःची कोणतीही एक चांगली सवय सांग. गुण १

प्रश्न क्र. १२) शिक्षकांनी झालेल्या अक्षरगटावर आधारीत विद्यार्थी संख्येइतके फळ्यावर शब्द लिहावेत व प्रत्येक विद्यार्थ्याकडून एका शब्दातील कोणत्याही एका अक्षराला गोल करण्यास सांगा. गुण १

प्रश्न क्र.१३) खालील शब्दांतील योग्य अक्षराला ा लावून अर्थपूर्ण शब्द तयार कर. गुण १

१) कपट २) मम ३) दरवजा ४) फळ

प्रश्न क्र. १४) खालील शब्दातील दुसऱ्या अक्षराला ी लाव. गुण १

१) वह_ २)पाकट ३) कळ ४) पाट_

प्रश्न क्र. १५) खालील शब्दातील ु असलेल्या अक्षराला गोल कर. गुण १

१) कुलूप २) झुळूक ३) जुलूम ४) सुर